The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# दासबोधप्रणीत नवविद्याभक्ती

**डॉ. भालेराव जी. पी.**
इतिहास विभाग, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली

लोकसंख्येच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी 'आपला आणि परावा' भेदबुध्दी न बाळगता विवेकाधिष्ठीत बुध्दीने बहुजनांस चाळविणारी आणि नाना मंडळे हालविणारी अशी रामदासाची परंपरा निर्माण करून स्वामी समर्थांनी सकल महाराष्ट्राला द-याखो-यातुन नवचैतन्य निर्माण केले. लोकसंख्येच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी देवधर्म, राजधर्म, क्षात्रधर्म इत्यादी संकल्पनांना स्वधर्म या विशाल संकल्पनेत समन्वित केले. चिंतनाची स्वभावाची व लोक व्यवहाराची बैठक त्यांनी जागृतपणे या ध्येयासाठी अनुकुल ठेवलेली दिसते

'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'

उपरोक्त विरक्त महात्मा पराकोटीचा क्रियाशील भक्त होता त्यात दुमत नाही. भारताच्या सर्व प्रांतातुन 1100 मठांची स्थापना रामदासानी केली. मठ पुजापाठ व जपजाप्य करण्याची स्थाने नव्हती, तर ती तेजस्वी संस्कार केंद्रे होते. सनातन धर्माचे ज्ञानदान, सदाचार, भक्ती भावाचा संस्कार यांसह पुरूषार्थाची प्रेरणा व बलोपासना यासाठी प्रत्येक मठात मारूतीरायाच्या मंदिरासह ग्रंथसंग्रह व व्यायामशाळा आवर्जुन असत. रामदासानी 12 वर्ष भारत वर्षाच्या तीर्थयात्रेत केली. यात्रेच्या निमीत्ताने समाजाचे खरे स्वरूप लक्षात आले. कुर परकीय आक्रमकांनी समाज भेदरलेला त्यांना आढळला. यवना कडून सातसुत्री कार्यक्रम राबविला, ज्यात मंदिरांचा विध्वंस, देवमुर्तीचे भजन, संपतीची लुट, गाईची हत्या, स्त्रियांचे अपहरण, बळजबरीने धर्मांतर व कांफीरांचे शिरकान आदीचा राजरोजपणे समावेश होता. रामदासांनी श्री रामाची उपासना करत आपण त्याचे शिष्य आहोत असे वेळोवेळी सांगितले. उपरोक्त संप्रदायास समर्थ संप्रदाय, राघवाचा धर्म, महाराष्ट्राचा धर्म असे संबोधले जाते.

प्रथम भजन ऐसें जाण। हरिकथा पुराण श्रवण।
नाना अध्यात्म निरूपण। ऐकत जावें।
(दशक 04 समाज 01 ओवी क्र.07- दासबोध)

पहिल्या भक्तीच्या प्रकारात भजन ऐकावे, भगवंताच्या कथा, पुराण, श्रवण करावे, नाना प्रकारच्या अध्यात्म निरूपणाचे श्रवण करावे. श्रवण हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ ऐकण्याचे इंद्रिय म्हणजेच कान म्हणून कानाला श्रवणेन्द्रिय असेही म्हणतात. प्रभुची शुभवार्ता कानी पडताच मन आनंदाने भरून येणे हा श्रवण भक्तीतील एक उच्चतम भाव आहे. सोळा संस्कारामधील कर्णवेध हा महत्वाचा संस्कार आहे. कर्ममार्ग, उपासना मार्ग, ज्ञान मार्ग, सिध्दांत मार्ग, योग मार्ग, वैराग्यमार्ग इत्यादीचे महत्व जाणून घेणे. सगुण भक्तीसाठी जयंत्या, उपोषणे, नाना साधने, नाना मंत्र, यंत्र जप व हयाने सतेच भगवंताची कीर्ती त्याची स्तुतिस्तोत्रे भजने यांची विविध प्रकार हे सर्व जाणून घ्यावे

मनापासून आवडी। जीवा पासून अत्यंत गोडी

सदा सर्वदा तांतडी। हरिकीर्तनाची
भगवंतास कीर्तन प्रिये। कीर्तनें समाधान होये
बहुत जनासी उपाये। हरिकीर्तनें कलयुगी
(दशक 04 समाज 02 ओवी क्र.06 व 07- दासबोध)

भक्तीच्या दुसऱ्या प्रकारात कीर्तनाचा समावेश आहे. भगवंताचे रूपवर्णन ऐकताना चरित्र, लीला, नाव महात्म्य आदी गोष्टी ओठातून बाहेर पडु लागला. शरिरावर रोमाच उभे राहिले पाहिजेत. ही कीर्तन भक्तीची लक्षणे होय. आपल्या वाणीचा अखंड यथायोग्य उपयोग करून भगवंतगुण वर्णन अखंड करावे. सगुण कथा म्हणजे कीर्तन, वाणी पवित्र, श्रोते सदाचारी हया बाबी कीर्तनातुन घडतात. श्रवणीमध्ये कुणीतरी ऐकणारा लागतो. कीर्तनात कुणी तरी सांगणारा हवा असतो, यामुळे श्रवण आणि कीर्तन ही सारखी जुळी भावंडे आहेत. नामदेव कीर्तन संप्रदायात कथेकरी बुवा आपल्या पायात चाळ बांधीत असतो. त्यात मधुन मधुन नृत्य करीत असतो श्रोता व वक्ता यांना समाधान देऊन बहुजन समाजाचाही उध्दार होण्याकरीता कलियुगात हरिकीर्तन हाच उपाय आहे.

स्मरण देवाचें करावे। अखंड नाम जपत जावें।
नामस्मरणे पावावे समाधान। नित्यनेम प्रातःकाळी।
मध्यान काळी नमस्मरण सर्वकाळी करीत जावे।
(दशक 04 समास 03 ओवी क्र. 02 व 03 - दासबोध)

नामस्मरण हा तिसरा भक्तीप्रकार असून भगवंताचे स्मरण करून अखंड नाम जपावे. विघ्नांचे निवारण, संकटाचा नामशेष फक्त नामस्मरणाने शक्य आहे. वर्णाश्रमातील सर्व घटकांना नामस्मरणाचा जन्मसिध्द हक्क आहे. लहान थोर असा भेदही यात नसतो. कोणत्याही वेळी नामस्मरण करता येते.

पादसेवन तेंचि जाणावे। कायावाचा मनोभावें
सदगुरूचे पाय सेवाने। सद्गतिकारणें।
या नांव पादसेवन। सदगुरूपदी अनन्यपण
निरसावया जन्ममरण। याता याती।
(दशक 04 समास 04 ओवी 02 व 03- दासबोध)

श्री समर्थ म्हणतात की, चौथी भक्ती पादसेवन तिची कृती म्हणजे काया वाचा मनोभावाने सदगती प्राप्तीसाठी श्री सदगुरूंच्या चरण कमलांची सेवा करणे, जन्म मरणाची यातायात कायमची चुकावी म्हणून सदगुरूचरणी अनन्य होणे यालाच पादसेवन म्हणतात देव, आत्मज्ञानी संत ही सेवेस योग्य स्थाने आहेत. अशा ठिकाणी दृढ सदभाव धरावा, पादसेवन भक्तीमध्ये पादसंवाहन हा भाग असून त्याचा अर्थ पायचेपणे, पाय रगडणे असा होतो. रामायणामध्ये भरताने पादसेवन भक्ती केली. प्रभू श्रीरामाच्या पावलांसमान त्यांच्या खडावा मानून त्याने केलेली ही पादसेवन भक्ती, चौदा वर्ष राज्य सांभाळावे असे चरित्र तिच्यातील भावना, कथा व चारित्र्य बंधुप्रेम कधीच आढळत नाही.

पाचवी भक्ती तें आर्चन। आर्चन म्हणिजे देवतार्जन
शास्त्रोक्त पूजा विधान। केलें पाहिजे।
नाना आसवें उपकर्णे। वस्त्रे आळंकार भूषणें

मानस पूजा मूर्तिहयाने। या नांव पाची भक्ती।

(दशक 04 समास 05 ओवी 02 व 03-दासबोध)

पाचवी भक्ती आर्चन असून संस्कृत भाषेतील अर्च म्हणजे पूजिणे सत्कार करणे या शब्दापासून मराठीत अर्चन हा शब्द त्याच अर्थी निर्माण झालेला आहे. गंध फुले आदि पुजासाहित्य घेतली. असल्याची मनातल्या मनात कल्पना करून श्रध्देने भगवंताची पूजा म्हणजेच अर्चन भक्ती होय. देव, अग्नी, साधुसंत, अतिथि अभ्यागत यांचे पूजन तसेच यती, ब्रम्हज्ञानी संत, गाय याचे पूजन करावे. काया, वाचा, मन, चित्त, वित म्हणजे पैसा अडका, जीव व प्राण थोडक्यात म्हणजे आपले सर्वस्व भगवंताच्या चरणी अर्पण करून अंतःकरणापासून त्याची पूजा करणे हीच ती अर्चन भक्ती होय.

सहावी भक्ती तें वंदन। करावें देवासी नमन।

संत साधु आणि सजन। नमस्करीत जावे।

साष्टांग नमस्कारास अधिकारू। नाना प्रतिमा देवगुरू

अन्यत्र नमनाचा विचारू। अधिकारें करावा।

(दशक 04 समास 06 ओवी 02 व 04-दासबोध)

वंदन करणे ही सहावी भक्ती आहे. देवाला नमन करावे. संत, साधु आणि सज्जन यांना नमस्कारकरीत जावे. देवांच्या निरनिराळया प्रतीमा देव आणि गुरू यांना साष्टांग नमस्कार घालावा कारण ते त्या अधिकारास पात्र आहेत. इतरांना नमस्कार करताना त्यांचा अधिकार, योग्यता पाहून यथायोग्य रीतीने करावा. वेद जाणणारा, सर्वभूत भविष्य वर्तमान जाणणारा, विव्दान पंडित पुराणिक आणि इतर विव्दज्जन तसेच याज्ञिक, वैदिक आणि पवित्र लोक यांना नमस्कार करावा. सर्व देवांना आदराने नमस्कार करावेत. दुभंगलेले मने परत जोडली जातात. नमन, प्रणाम, प्रणती, नती दंडवत असेही शब्द वंदन नमस्काराला आहे. तिन्ही प्रकारच्या कायिक, वाचिक, मानस नमस्कार साष्टांग नमस्कार सर्वश्रेष्ठ यामध्ये शरिराची विविध अंगे भूमातेला टेकतात.

सातवें भजन तें दास्य जाणावें। पडिलें कार्य तितुकें करावे।

सदा सविधची असावे देवाव्दारी। जें जें कांही पाहिजे। तें तें तत्काळचि देजे।

अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा (दशक 04 समास 07 ओवी 02 व 20-दासबोध)

सातवी भक्ती दास्य भक्ती असून जे पडेल ते देवाचे काम करावे लागते व सदासर्वदा जवळच देवाव्दारी असावे लागते. देवाचे वैभव आपण सांभाळावे. त्यात काही उणे पडूच देऊ नये. देवाच्या सेवेसाठी ज्या-ज्या गोष्टीची आवश्यकता असेल त्या-त्या तात्काळ पुरवाव्यात आवडीने सेवा करावी. सर्वांशी नम्रतेने बोलावे, स्तुती करून सर्वाच्या अंतकरणास सुख होईल असे बोलावे, स्तुती करून सर्वाच्या अंतकरणास सुख होईल असे बोलावे. समर्पणाची भावना गरजेची आहे.

देवासी परम सख्य करावें। प्रेम प्रीतीने बांधावें।

आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावे

मनासरिखें होता स्वभावें। सख्य घडे नेमस्त

(दशक 04 समास 08 ओवी 02 व 05-दासबोध)

श्री समर्थ सख्य भक्तीनिरूपण विषयी सांगतात, देवाशी परम सख्य करावे, त्याला प्रमाने बांधुन ठेवावे. देवाला ज्या गोष्टी बद्दल प्रिती असेल त्याच गोष्टी आपण कराव्यात. त्याला आवडेल तसेच आपण वागावे. आपण त्याच्या मनासारखे वागू लागलो म्हणजे साहजिकच निश्चितपणे सख्य होते. देवाच्याच निर्गुण स्वरूपाचे निरूपण करावे. आपले सर्व काही गेले तरी चालेल पण भगवंताशी सख्य मात्र कायम टिकून राहिले पाहिजे. सख्यभक्ती ही जरी परतत्वांशी संलग्न असली तरी त्याची सांगड आपल्या ऋषीमुनीनी ऋग्वेद काळापासून गृहसंस्थेशी घातलेली आहे सूर्य हा विश्वातील प्राणीमात्राचा सखा होय.

नवमी निवेदन जाणवें। आत्मनिवेदन करावें। तेही सांगिजेल स्वभावें। प्रांजळ करूनि।

ऐका निवेदनाचें लक्षण। देवासि वाहावें आपण। करावे तत्वविवरण। म्हणिजे कळे

(दशक 04 समास 09 ओवी 03 व 04- दासबोध)

नवव्या भक्तीला निवेदन भक्ती म्हणतात. यात आपण स्वतःला देवास समर्पण करावे. पंच भूतांमध्ये आकाश, श्रेष्ठ, सर्व देवामध्ये जगदीश श्रेष्ठ त्याच प्रमाणे नवविद्याभक्तीमध्ये आत्मनिवेदन भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. आत्मऽनिवेदन याचा अर्थ स्वतःपाशी स्वतःचे असलेले देवाला अर्पण करणे. नवविद्याभक्ती वेगवेगळया स्वरूपात पाहावयास मिळते रामायणात रामाप्रती, भगवतगीतेमध्ये कृष्णाप्रती तर दासबोध मध्ये देखील रामाप्रती पाहावयास मिळते. मानवी जीवन सुसहय व्हावे यासाठी भक्तीचा स्विकार करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:** 1. दासबोध - गद्यरूपांतरासह गीता प्रेस गोरखपूर, व्दितीय प्रत, 2006